नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०९/२०२६ (शनिवार )

.......................................................................................................

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०५/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन काटोल आणि नरखेड च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन काटोल**:— श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री रणजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्यासह काटोल येथील इतर प्रशासकीय अधिकारी, काटोल पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी काटोल शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च गळपुरा, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, मेन रोड, बस स्टॉप, रेस्ट हाउस या मार्गाने घेण्यात आला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या उपस्थितीत सहा पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे , प्रभारी अधिकारी, पोलीस

स्टेशन नरखेड यांच्यासह नरखेड पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी नरखेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च पोलीस स्टेशन ते स्वामी विवेकानंद चौक, विठ्ठल रूक्मीनी मंदीर मार्ग, गांधी चौक, जयस्तंभ चौक, दुर्गा मंदीर ,बस स्टॅंड ते परत पोलीस स्टेशन या मार्गाने घेण्यात आला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**




वैशाली
औषधीचे दुकान




POLICE


ULTRA


ज्ञानार्जन केंद्र
अंबिका
बँन्ड


Agri Needs
Kids & Ladies Wear


Agri Needs
Kids & Ladies Wear



## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**आज दिनांक ०५/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन रामटेक** :— पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत श्री प्रियांश महाजन उपविभागीय अधिकारी रामटेक, श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक उपविभाग रामटेक, श्री रमेश कोळपे, तहसीलदार रामटेक, श्री राजेश कुमार थोरात, पोलीस निरीक्षक, रामटेक, श्रीमती पल्लवी राऊत, मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक, श्री मयूर वंजारी सहाय्यक अभियंता रामटेक, श्री जावेद शेख एम एस ई बी कार्यालय रामटेक यांच्या उपस्थितीमध्ये

आगामी सणोत्सव संदर्भात उपविभागीय कार्यालय रामटेक येथे प्रशासकीय अधिकारी यांची बैठक पार पडली.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक उपविभाग रामटेक आणि सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य ,पोलीस पाटील आणि डिजे मालक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— श्री सागर खर्डे ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** श्री शशांत एन एम गौडा ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि पोलीस पाटील यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन नरखेड :—** श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग आणि सहा पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन नरखेड यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि पोलीस पाटील यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन उमरेड :—** पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन उमरेड येथे आगामी पोळा सण आयोजक, डिजे मालक आणि शांतता समिती सदस्य बैठक घेण्यात आली.


**पोलीस स्टेशन मोहपा :—** पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मोहपा यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन मोहपा येथे आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि पोलीस पाटील यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन वडोदा :–** सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वडोदा यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन वडोदा येथे आगामी सणोत्सव संदर्भात डिजे मालक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कुही :–** पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कुही यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन कुही येथे आगामी सणोत्सव संदर्भात डिजे मालक , गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :–** सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**सर्व आयोजकांना विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, मंडप उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घ्याव्यात, महावितरणकडून विद्युत जोडणीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी तसेच गणेश मंडपामुळे रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**










२) श्री. संदीप पाटील भा.पो.से.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर
३) श्री. हर्ष ए. पोद्दार भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण)
४) श्री. अनिल मस्के भा.पो.से.
अप्पर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण)
५) डॉ. श्री. संतोष गायकवाड म.पो.से.
उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान
WADODA POLICE STATION
By bickvicof5 Wadoda,Nagpur Division




पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य
शाखा कुही




पोलीस स्टेशन नरखेड
जिल्हा नागपूर ग्रामीण
गणेशोत्सव
पोळा
शांतता समिती मीटिंग
शांतता, सौहार्द व एकतेचे...!
2026.09.05 12:17



# जर्मन तार चोरीचा गुन्हा उघड,
# ०२ आरोपी अटक, ८ लाख ६० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त
# जलालखेडा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन जलालखेडा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलीसांनी जर्मन तार चोरीचा गुन्हा उघड करून २ आरोपीला अटक केले. सदर गुन्हयात ८,६०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथील पोलीस पथक रात्रगस्तीवर असताना मोहाड फाटा एक वाहन संशयास्पदरीत्या आढळून आले. सदर वाहनातील इसमाने पोलीस पथकास पाहताच वाहनासह पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याचा शिताफिने पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव आरोपी क्रमांक १) मोहम्मद काशिफ अब्दुल आरिफ शेख, वय २४ वर्ष, रा.पेठ अहमदपुर, ता. आष्टी, जि. वर्धा असे असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याच्या वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये मोठ्या प्रमाणात जर्मनची तार आढळून आली. सदर मुद्देमाल पोलिसांनी तात्काळ जप्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत आरोपीकडे कौशल्यपूर्ण चौकशी केली असता सदर जर्मन तार ही महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडुन लोहारी सांवगा, खराळा आरंभी, हिवरमठ व उदापूर येथे लोखंडी पोलवर लावण्यात आलेली असल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी क्रमांक १) मोहम्मद काशिफ अब्दुल आरिफ शेख, वय २४ वर्ष, रा.पेठ अहमदपुर, ता. आष्टी, जि. वर्धा याला ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने त्याचा भाऊ २) मोहम्मद कैफ अब्दुल आरिफ शेख, वय २४ वर्ष, रा. पेठ अहमदपुर, ता. आष्टी, जि. वर्धा याचा सुध्दा गुन्हयात सहभाग असल्याचे सांगितले. दोन्ही **आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) जर्मनचा CONDUCTER तार अंदाजे ०९ बंडल किंमती २,००,०००/— रूपये २) एक अशोक ले लॅन्ड कंपनीचे दोस्त पिकअप क्र एम. एच.**

—४०/सि.डी.—५६६१ किंमती ६,००,०००/— रूपये आणि रोख रक्कम ६०,०००/— रूपये  असा एकुण किंमती ८,६०,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




## कुही पोलीसांच्या प्रभावी उपाययोजनांमुळे घरफोडींच्या गुन्ह्यांमध्ये १० टक्के घट तसेच गुन्हयांची उकल करण्याच्या प्रमाणात ११ टक्के वाढ

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीसांनी पोलीस स्टेशन कुही हद्दीत घरफोडीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविल्याने घरफोडी च्या गुन्हयात १० टक्के घट तसेच गुन्हयांची उकल करण्याच्या प्रमाणात ११ टक्के वाढ झाली आहे.

कुही पोलीसांकडुन रात्रीच्या वेळी दुहेरी (Dual) पेट्रोलिंग म्हणजे कुही ग्रामीण आणि शहरी भागात पेट्रोलिंग तसेच कुही शहरात चारचाकी वाहनाची सातत्याने पेट्रोलींग, संवेदनशील ठिकाणी विशेष गस्त, संशयित व्यक्तींची पडताळणी, वाहने तपासणी तसेच रात्री सातत्याने नाकाबंदी अशा प्रभावी उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत आहेत. **कुही पोलीसांच्या प्रभावी उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, जानेवारी ते ऑगस्ट २०२५ या तुलनेत जानेवारी ते ऑगस्ट २०२६ मध्ये घरफोडीच्या गुन्हयांमध्ये एकुण १० टक्के घट झाली आहे तसेच गुन्हयांची उकल करण्याच्या प्रमाणात ११ टक्के वाढ झाली आहे. घरफोडी, चोरीसह सर्व प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील.**

## उमरेड पोलिसांच्या पाठपुराव्यामुळे महामार्गावरील उड्डाणपुलांवरील बंद लाईट (पथदिवे) तात्काळ सुरू

**पोलीस स्टेशन उमरेड हद्दीतील गांगापुर उडानपुल ते उमरेड बायपास रोड वरील लाईट (पथदिवे) काही दिवसांपासून बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता तसेच अपघात होण्याची शक्यता वाढली होती. याची गंभीर दखल घेऊन मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री मयंक माधव,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्याशी समन्वय साधून सातत्याने पाठपुरावा केला.**

**त्याअनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी त्वरित कार्यवाही करून गांगापुर उडानपुल ते उमरेड बायपास रोड वरील सर्व बंद लाईट (पथदिवे) पुन्हा सुरू केले आहे.**

# गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रामटेक आणि काटोल येथे गणेश स्थापना मार्ग ,विसर्जन मार्ग व विसर्जन स्थळाची करण्यात आली पाहणी

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश स्थापना आणि विसर्जन मिरवणुकी दरम्यान वाहतूक कोंडी, गर्दी, अडथळे, वीजवाहिन्या, रस्त्यांची स्थिती तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित संभाव्य धोके आधीच ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करता याव्यात, यासाठी आज दिनांक ०५/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत आणि पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी करण्यात आली.

रामटेक येथे सदर पाहणी श्री. प्रियांश महाजन, उपविभागीय अधिकारी, रामटेक, श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, श्री. रमेश कोळपे, तहसीलदार, रामटेक, श्रीमती पल्लवी राऊत, मुख्याधिकारी, नगरपरिषद रामटेक, श्री. राजेश कुमार थोरात, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रामटेक, श्री. मयूर वंजारी, सहाय्यक अभियंता, रामटेक तसेच श्री. जावेद शेख, एम.एस.ई.बी. कार्यालय, रामटेक यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

काटोल येथे सदर पाहणी श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, पोलीस निरीक्षक श्री रणजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी काटोल पोलीस स्टेशन, नायब तहसीलदार श्री गुणवंत भुजाडे,सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता श्री शेखर घंटाफळे, उपमुख्य अधिकारी श्री हेंबाडे, काटोल नगर परिषद, एम एस ई बी अभियंता श्री बालपांडे, अग्निशामन अधिकारी श्री सतीश गोफणे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

रस्ता तपासणीदरम्यान विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील वाहतूक व्यवस्था, रस्त्यांची स्थिती, संभाव्य अडथळे, गर्दीची ठिकाणे, वीजवाहिन्या, प्रकाशव्यवस्था तसेच विसर्जन स्थळावरील आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला. स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींवर तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून वाहतूक, सुरक्षा, वीज, स्वच्छता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

# रामटेक






# काटोल



111859
HHA ADS.
TAYWADE
MULTI SPECIALITY
HOSPITAL
CONTACT
9379111859




## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी फिर्यादी श्री.विनोद पितांबरलाल जयस्वाल, वय ५३ वर्ष, रा.मनसर, त. रामटेक, जि.नागपुर यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे तक्रार दिली की, फिर्यादी आणि आरोपी १) विवेक हरिपाल नारनवरे, २) हरिपाल नारनवरे, दोन्ही रा. मनसर ता. रामटेक, जि. नागपुर हे एकाच गावातील रहीवासी असुन यातील आरोपी क्र. १) हा दिनांक ०३/०९/२०२६ रोजी फिर्यादीचे रेस्टॉरेंटमध्ये मिठाई घेण्याकरीता गेला असता सदर मिठाईच्या ११० रुपयांच्या देयकावरून फिर्यादी आणि आरोपी मध्ये वाद झाला. तेव्हा आरोपी विवेक हरिपाल नारनवरे व हरिपाल नारनवरे, रा. मनसर यांनी फिर्यादी व त्यांच्या मुलास अश्लील शिवीगाळ करून मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकीही दिली. याच भांडणाच्या कारणावरून थोड्यावेळाने आरोपी क्र. १ हा आरोपी क्र. २ याला घेवुन फिर्यादीचे रेस्टॉरेंटमध्ये आला व फिर्यादी व त्यांचे मुलाला अश्लिल शिवीगाळ करून फिर्यादीला आणि फिर्यादीच्या मुलाला मारहाण करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०९(१), २९६, ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीतांना दिनांक ०४/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अकिल वल्द रज्जाक कुरेशी यांचे राहते घर वार्ड क्र. ११, कसाईपुंरा सावनेर, ता. सावनेर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सावनेर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अनिस वल्द सलीम कुरेशी, वय ३० वर्ष, २) दानिश वल्द युसुफ कुरेशी, वय २२ वर्ष, ३)साबीर वल्द गफार कुरेशी, वय २२ वर्ष, ४) समीर वल्द अकिल कुरेशी,**

**वय २० वर्ष, ५) मोनिश वल्द युसुफ कुरेशी, वय २२ वर्ष, ६) अकिल वल्द रज्जाक कुरेशी, वय ५० वर्ष, ७) आबीद वल्द गफार कुरेशी, वय २३ वर्ष ८) आसिम वल्द सलाम कुरेशी, वय २४ वर्ष, ९) रिजवान वल्द रज्जाक कुरेशी, वय २६ वर्ष, सर्व रा. वार्ड क्र. ११, कसाईपुंरा सावनेर, ता. सावनेर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम २६३०/—रूपये असा एकुण २६८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे जतीन उर्फ गोपाल वाईलकर, वय १८ वर्ष, रा. सात नंबर नाका, राजा यादव यांच्या घराजवळ, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर २) आदीत्य दिनेश लाडेकर, वय २१ वर्ष, रा. सात नंबर नाका, वानखेडे चक्कीजवळ, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर हे हरीहर नगर, पाण्याच्या बोरींग जवळ कन्हान येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. त्यास त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी १) आशिष राजन मेश्राम, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र ०३, खंडाळा ता. पारशिवनी २) सिध्दार्थ विठोबाजी मेश्राम, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र ०३, खंडाळा ता. पारशिवनी हे मौजा नॅशनल हायवे ४४, खंडाळा शिवार, ता. पारशिवनी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. या आरोपीतांविरूद्ध संबंधित पोलीस स्टेशनला कलम २७ एमडीपीएस कायद्यान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

## उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी उपस्थित राहून आरोपींची केली तपासणी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०५/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना अधिक प्रभावी पणे राबविण्यात येत आहे. नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दर मंगळवार व शुक्रवार नियमितपणे घेण्यात येणाऱ्या आरोपी परेडमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी स्वत: आरोपी परेडमध्ये उपस्थित राहून आरोपींची तपासणी केली. तसेच संभाव्य गुन्हेगारी हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे, संशयित व्यक्तींची माहिती अद्ययावत ठेवणे, प्रतिबंधात्मक कारवाई

प्रभावीपणे राबविणे याबाबत पोलीस अधिकारी व अंमलदारांना आवश्यक त्या सूचना दिल्या. **एकुण ७३० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २८ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.


ORBIT
WIRES & CABLES
www.orbitcables.com
महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन भिवापुर
दुरध्वनी क्रं: 07100-6232224 जि. नागपुर (ग्रा.)














जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा